


अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड


Lubi Pumps
प्रेशर पम्प, सेल्फ प्रायमिंग पम्प
गुरुगणेश एंटरप्रायजेस - सोलापूर
94235 90463 / 94235 88463

www.surajyadigital.com । मंगळवार, दि. २६ नोव्हेंबर २०२४ । ▸ वर्ष : २३ वे ▸ अंक : ५८ वा ▸ किंमत : ५ रुपये ▸ पाने ८

# शिंदेंना केंद्रीय आमंत्रण; अजितदादांचा अजबच फॉर्म्युला

✔ सोलापूर/विशेष प्रतिनिधी

राज्याच्या विधानसभा निवडणुकीत महायुतीला मराठी जनतेने निर्विवाद बहुमत दिले असले तरी मुख्यमंत्रीपदाबाबत युतीच्या वरिष्ठ नेत्यांमध्ये एकमत होत नाहीय,असे दिसत आहे.निकाल लागून तीन दिवस झाले तरी युतीचे अजूनही मौन बाळगून आहेत.देवेंद्र फडणवीस,एकनाथ शिंदे यांच्यात या पदासाठी रस्सीखेच सुरू असून अजितदादांनी एक स्वतंत्र फार्म्युला ठेवून भाजपची डोकेदुखी वाढवली आहे.मुखमंत्रीपदाचा खेळ रंगणार असला तरी खरी धुळवड दिल्लीत होणार आहे. त्यासाठी भाजपसह एकनाथ शिंदे गटाने नेते सोमवारी राजधानीत दाखल झाले आहेत.या पदाच्या उत्सुकतेसाठी राज्याला अजून तीन-चार दिवस प्रतिक्षा करावी लागण्याची चिन्हे आहेत. सत्ता स्थापनेसाठी म हायुतीकडून बैठका सुरु आहेत. सत्ता स्थापनेपूर्वी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, अजित पवार यांची दिल्लीवारी होणार आहे. २७ किंवा २८ तारखेला सरकार स्थापन होण्याची शक्यता आहे..

## खेळ रंगलाय महाराष्ट्रात | धुळवड दिल्लीत

### फडणवीसांचे नाव फायनल, शिंदेंचे काय?

भाजपकडून मुख्यमंत्रीपदासाठी देवेंद्र फडणवीस यांचे नाव फायनल झाले आहे. तर दुसरीकडे एकनाथ शिंदे यांनी मुख्यमंत्रीपदावरील दावा सोडावा, यासाठी दिल्लीतून भाजपश्रेष्ठींकडून शिंदेंवर दबाव येत असल्याची विश्वसनीय माहिती आहे.

### या फॉर्म्युल्याची चर्चा फेटाळली...

शिवसेनेचे नेते मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी अडीच-अडीच वर्षांचा मुख्यमंत्रीपदाचा फॉर्म्युला दिल्याचे सांगितले जाते. अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसकडून २-२-१, असा फॉर्म्युला दिल्याचे सूत्रांची माहिती आहे. भाजप आणि शिवसेनाला प्रत्येकी दोन वर्षे आणि राष्ट्रवादीला एक वर्षे, मुख्यमंत्रीपदावर संधी दिली जाऊ शकते. परंतु दिल्लीत निर्णय होईल, असे सांगितले जात आहे. महाराष्ट्रातील महायुतीकडून या फॉर्म्युल्याची चर्चा फेटाळण्यात आली आहे.

### फडणवीस मुख्यमंत्री झाले तर शिंदेंसाठी बी प्लॅन?

देवेंद्र फडणवीस यांच्याकडे महाराष्ट्राची धुरा सोपवली गेली, तर भाजपकडे एकनाथ शिंदे यांच्यासाठी प्लॅन बी काय असू शकतो? एकनाथ शिंदे सध्या मुख्यमंत्री आहेत. ते मुख्यमंत्रीपदावरून उपमुख्यमंत्रीपदावर येतील का? हा प्रश्न आहे. अशा स्थितीत फडणवीस महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाले, तर भाजप एकनाथ शिंदे यांना दिल्लीत येण्याचे निमंत्रण देऊ शकते आणि एकनाथ शिंदे नरेंद्र मोदींच्या मंत्रीमंडळात सामील होऊ शकतात.




देवेंद्र फडणवीस प्रबळ दावेदार

एकनाथ शिंदे यांच्या बाजूनेही अनेक फॅक्टर

अजित पवार मात्र शांत; आमदारांची इच्छा मुख्यमंत्री व्हावेत दादा

### भाजपच्या वरिष्ठ नेत्यांसोबत बैठक

दरम्यान, देवेंद्र फडणवीस, एकनाथ शिंदे आणि अजित पवार या तीनही नेत्यांची सोमवारी सायंकाळी दिल्लीमध्ये भारतीय जनता पक्षाच्या (भाजप) वरिष्ठ नेत्यांसोबत बैठक झाल्याचे वृत्त आहे. एकनाथ शिंदे आज सायंकाळी दिल्लीत पोहोचल्याचे वृत्त आहे तर श्रीकांत शिंदे दिल्लीत पोहोचले आहेत. दरम्यान, नव्या मुख्यमंत्र्यांच्या शपथविधीला ३-४ दिवसही लागू शकतात, असेही वृत्त आहे.

### फडणवीस दिल्लीला रवाना

सोमवारी सायंकाळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस दिल्लीला रवाना झाले आहेत. ते केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची रात्री भेट घेणार आहेत. या भेटीत राज्याच्या मुख्यमंत्र्याचे नाव फायनल होणार असल्याचे सांगण्यात येत आहे. याबाबत अंतिम निर्णय घेतला जाणार आहे. त्यामुळे आजच्या बैठकीत काय होतंय हे पाहणे महत्वाचे ठरणार आहे.

# सोलापूरच्या सामान्य वर्गालाही घडणार हवाई सफर


## विमानसेवेचे दर निश्चित



✔ सोलापूर/प्रतिनिधी

जिल्हावासियांसाठी एक आनंदाची बातमी आहे. सोलापूर-मुंबई आणि सोलापूर-गोवा या थेट हवाई मार्गांच्या विमानसेवेचे दर जाहीर झाले आहेत. सोलापुरातील श्रीमंतांचे सोडून द्या अगदी मध्यमवर्गीय आणि गरीब लोकांनाही हवाई सफर घडली पाहिजे,याचा विचार करून फ्लाय ९१ कंपनीने तिकिटाचे दर निश्चित केले आहेत.

हे दर स्वस्त आणि प्रवाशांच्या बजेटमध्ये बसणारे आहेत. या नव्या सेवेमुळे सोलापूरकरांना विमान प्रवासाचा जलद आणि आरामदायी आनंद लवकरच मिळणार आहे. सोलापूर विकास मंचचे सदस्य विजय कुंदन जाधव यांनी फ्लाय ९१ कंपनीच्या अधिकाऱ्यांना दराच्या संदर्भात ई-मेलद्वारे माहिती मागितली होती. त्यास सकारात्मक प्रतिसाद मिळाला आहे. सोलापूर ते मुंबई थेट मार्गावर तिकिटांचा प्रारंभिक दर फक्त १हजार ४८८ रुपयांपासून सुरू होतो. विविध स्लॅबमध्ये दर वाढत जातात, जे प्रवाशांच्या मागणी आणि उपलब्धतेनुसार ठरवले जातात. उच्चतम दर ९ हजार ५८४ रुपयांपर्यंत आहे.



अतिरिक्त शुल्कात २१७ रुपये युजर डेव्हलपमेंट फी, २३६ रुपये विमान सुरक्षा शुल्क आणि ५% जीएसटीचा समावेश होतो. सोलापूर ते गोवा थेट मार्गावर तिकिटांचा प्रारंभिक दर फक्त ६८९ रुपये आहे. या मार्गावरही स्लॅबनुसार दर ८हजार ७८५ रुपयांपर्यंत जातात. अतिरिक्त शुल्कातही युडीएफ, एएसफ आणि जीएसटीचा समावेश आहे, जो मुंबई मार्गाप्रमाणेच आहे.

### प्रवाशांसाठी स्वस्त व सोयीस्कर पर्याय

सोलापूर विमानतळाच्या या सेवेमुळे प्रवाशांना जलद आणि किफायतशीर प्रवासाचा आनंद घेता येणार आहे. या मार्गावर महाराष्ट्र शासनाच्या व्हायबिलिटी गॅप फंडिंग आणि रीजनल कनेक्टिव्हिटी योजना' अंतर्गत विमान सेवा देण्याचा प्रस्ताव केंद्रात असल्याने काही मार्गांवर फक्त जीएसटी लागू होतो, ज्यामुळे प्रवास अधिक परवडणारा ठरतो.

### असाही एक पूर्वानुभव...

सोलापूरचे चित्र बदलत आहे.व्यापार आणि उद्योग क्षेत्राचे जाळे वाढत चालले आहे तसेच परदेशातून अनेक कंपन्यांचे सीईओ सोलापूरला येत असतात.या सर्वांकडून विमानसेवेची अपेक्षा व्यक्त केली जात होती.त्यानुसार ही सेवा सुरू होणार आहे.यापूर्वी किंगफिशरची सेवा आठवड्यातून दोन-तीन दिवस सुरू होती.तिकिट दर माफक ठेवल्यामुळे प्रवाशी वाढले होते.अगदी शाळांनी बुकिंग करून विद्यार्थ्यांना हवाई सफर घडली होती.सोलापूरच्या सामान्य शेतकरीही विमानी बसूनी गगनाची सहल केलेली होती.

### तिरूपती, बंगळुरू, हैंदराबादची वाढती मागणी

सोलापुरातून हैदराबाद, बेंगलोर आणि तिरूपती या तीन शहरांसाठी विमानसेवा आवश्यक असल्याची मागणी जोर धरू लागली आहे.तिरूपतीला सोलापूरसह परिसरातून शेकडो भाविक रोज तिरूपतीला जात असतात तसेच हैदराबाद आणि बंगळुरूला सोलापूरचा मोठा व्यापारी संबंध आहे.या शहरांची विमानसेवा सोलापूरकरांना लाभदायक आणि विमान कंपन्यांना फायदेशीर ठरू शकेल.

### विमानाच्या वेळा

**मुंबई ते सोलापूर**
निघण्याची वेळ : सकाळी ११:५५
पोहोचण्याची वेळ: दुपारी १:४५

**सोलापूर ते मुंबई**
निघण्याची वेळ: सकाळी ९:४०
पोहोचण्याची वेळ: सकाळी ११:२०

**गोवा ते सोलापूर**
निघण्याची वेळ: सकाळी ८:००
पोहोचण्याची वेळ: सकाळी ९:१०

**सोलापूर ते गोवा**
निघण्याची वेळ: दुपारी २:१५
पोहोचण्याची वेळ: दुपारी ३:३०

## भाजपश्रेष्ठी अमित शहा आज मुंबईत

✔ मुंबई : राज्यातील मुख्यमंत्रीपदाच्या संदर्भात भाजपाची दिल्लीत सोमवारी बैठक झाली असून आज मंगळवारी भाजपश्रेष्ठी अमित शहा हे मुंबईत येणार आहेत. स्थानिक नेत्यांशी चर्चा करून ते मुख्यमंत्रीपदाच्या उमेदवाराची घोषणा करण्याची शक्यता आहे.दिल्लीश्वरांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना मुख्यमंत्रीपद भाजपकडेच राहील,असा निरोप दिल्याचे दिल्लीचे रात्री उशिरा हाती आलेले वृत्त आहे. जवळपास देवेंद्र फडणवीस यांचे नाव निश्चित असल्याचे सांगण्यात येते.

# लाडक्या बहिणींकडून सत्तेची ओवळणी महायुतीच्या ताटात
# बळीराजाचं 'दान'देखील खुशीत; जरांगे-पाटील निष्प्रभ

## मराठा आरक्षणावर वज्रमूठ आवळलेल्या मराठ्यांच्या स्थिती अन् गतीवर प्रश्नचिन्ह | मनोज जरांगे-पाटलांच्या धरसोड भूमिकेने विधानसभेला विस्कटलेली पेंडी भविष्यात कशी सावरली जाणार?

✔ शिवाजी भोसले/सोलापूर

लाडक्या बहीणींनी सत्तेची ओवाळणीच जणू काही महायुती सरकाच्या ताटात टाकली. दुसऱ्या बाजूला महायुतीसह केंद्र सरकारनं किसान सन्मान निधी, दुष्काळ अन् अवर्षणग्रस्त निधी, एक रुपयात पीक विमा, दोन लाखांपर्यंतची कर्जमाफी आदी बळीराजाला दिलास मिळेल, असं दान बळीराजाच्या पदरात टाकलं. उपकराची परत फेड करण्यात दिलदार असलेल्या बळीराजानेदेखील अगदी खुशीनं महायुतीलाच उत्फुर्तपणे मताचं 'दान' दिलं. यातून ईव्हीएममधून महायुतीवर मतांचा पाऊस पडला. महायुतीला अनपेक्षित यश मिळाला. या सगळ्या घडमोडींमध्ये विधानसभेच्या निवडणुकीत मराठा संघर्षयोद्धा मनोज जरांगे-पाटील यांच्या फॅक्टर निष्प्रभ ठरला. राज्यातील ४६ मतदारसंघातून २९ मराठा विजयी झाले.

विशेषत्वे, सोलापूर जिल्ह्यातून ३ मराठा चेहरे महाराष्ट्राच्या विधानसभेत गेले. समाधान अवताडे, अभिजित पाटील आणि सुभाष देशमुख हे मराठा चेहरे आमदार झाले. भाजपच्या उमेदवारांना पाडा आणि गाडा असा संदेश असतानाच भाजपचे सुभाष देशमुख आणि समाधान अवताडे हे दोघे पुन्हा आमदार झाले तर अभिजित पाटील हे मराठा मतांमुळेच विजयी झाले असा दावा करता येणार नाही.




खास करुन बाब म्हणजे मनोज जरांगे-पाटलांचा फॅक्टर अक्षरश: निष्प्रभ ठरल्याने मराठा आरक्षणावर वज्रमुठ आवळलेल्या मराठ्यांच्या स्थिती अन् गतिवर प्रश्नचिन्ह आले आहे. शिवाय मनोज जरांगे-पाटलांच्या धरसोड भूमिकेने विधानसभेला विस्कटलेली पेंडी भविष्यात कशी सावरली जाणार? हे पाहणंदेखील तितकंच महत्त्वाचा राहणार आहे.

सोलापूर जिल्ह्यासह महाराष्ट्र विधानसभा निवडणुकींचा निकाल 'न भूतो न भविष्यती' असाच लागला. या निकालाने अनेक दिग्गजांना धक्का दिला. भाजपने एकांगी विजय मिळवला. ईव्हीएममधून मतांचा अक्षरश: पाऊस पडला. जनतेने भरभरून मतदान केले. भाजपच्या लाटेत अनेक दिग्गज आणि पक्ष भुईसपाट झाले. त्यांच्या अस्तित्वाची लढाईच जणू ऐरणीवर आली. तर दुसरीकडे मनोज जरांगे-पाटील यांचा फॅक्टरसुद्धा निष्प्रभ ठरल्याचे मानले जात आहे. या हाराकिरींची कारणे शोधली गेली असून त्यासंबंधींची चर्चादेखील खुद्द सकल मराठा समाजासह ओबींसी समाजामध्ये सुरु झाली आहे. विविध राजकिय पक्षांमध्येदेखील यावर चर्चा रंगली आहे.

## तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



किसी का सच हुआ,
किसी का सपना रहा !

| कल्याण |
|---|
| 379-90-280 |

| मुंबई |
|---|
| 246-21-290 |

## महायुतीला मिळालेले यशाची 'ही' कारणं

**माझी लाडकी बहीण योजना**

या योजनेचा महायुतीला मोठे पाठबळ मिळाले. निवडणुकीच्या तोंडावर सुरू झालेल्या या योजनेला ग्रामीण आणि शहरी महिलांमध्ये महायुतीविषयी चांगले मत निर्माण केले आणि त्यांचे मतात सुद्धा रूपांतर झाले. महायुतीला वाढलेल्या महिला मतदारांचा फायदा झाला.




**छोट्या-छोट्या जातींची बांधली मोट**

महायुतीने केवळ पारंपारिक मराठा आणि ओबीसी मतांवरच मदार ठेवली नाही. तर छोट्या-छोट्या समाज घटकांना सोबत घेतले. निवडणुकीपूर्वी काही जातींना आरक्षण देण्याची खेळी मोठा संदेश देऊन गेली.

**मतांच्या वाढलेल्या टक्क्यांचा फायदा**

महाराष्ट्रात शहरी भाग वगळता इतरत्र जोरदार मतदान झाले. मतांचा टक्का वाढला. पहिल्यांदाच इतक्या मोठ्या प्रमाणात मतदान झाले. ग्रामीण भागातून भाजपा-महायुतीला भरघोस मतं मिळाल्याचे दिसून आले.




**संघाचे सुक्ष्म नियोजन**

राष्ट्रीय स्वंयसेवक संघाच्या सुक्ष्म नियोजनामुळे भाजपाला मोठा फायदा झाला. कोपरा बैठक, स्वयंसेवकांचा मतदारांशी थेट जनसंपर्क याचा या बंपर विजयात सर्वात मोठा वाटा आहे.

**'मविआ'त समन्वयाचा अभाव**

महाविकास आघाडीत समन्वयाचा मोठा अभाव दिसून आला. तीनही पक्षात ताळमेळ दिसला नाही. काँग्रेस आणि उद्धव सेनेतील वाद तर टोकाचे ताणले होते. जनतेत विश्वास निर्माण करण्यात त्यांना यश आले नाही.

## 'या'मुळे डावलला जरांगे-पाटील फॅक्टर

**जरांगेंची संभ्रमाची भूमिका**

विधानसभा निवडणूक लढवण्याची घोषणा केल्यानंतर शेवटपर्यंत जरांगेचं तळ्यात-मळ्यात सुरू होते. नेत्याचा हा संभ्रम मतदारांना ही पटला नाही. ते सारखे भूमिका बदलवत असल्याचे दिसले. वारंवार भूमिका बदलल्याने मराठा मतदार महायुतीकडे वळला.

**गोंधळाची परिस्थिती**

मनोज जरांगे-पाटील यांनी वारंवार आता पाडायचे आणि लढायचे असा नारा दिला. पण नंतर तेच कुणाच्या बाजूला आहेत आणि



कुणाविरोधात आहेत हे समोर आले नाही. त्यांचे टार्गेट जर फडणवीस आणि भुजबळ होते तर त्यांनी थेट मैदानात उतरणे गरजेचे होते.

**महायुतीचे एक पाऊल पुढे**

मनोज जरांगे-पाटील यांचा प्रभाव कमी करण्यासाठी महायुतीने जास्तीत जास्त मराठा उमेदवार मैदानात उतरवले. ही खेळी एकदम प्रभावी ठरली. ४६ मतदारसंघातून २९ मराठा उमेदवार विजयी ठरले. सोलापूर जिल्ह्यात ३ मराठा उमेदवार विजयी झाले. मराठा मतदारांनी महाविकास आघाडीविरोधात मतदान केले.

**फडणवीसांवर टीकेचा रोख**

महायुतीमध्ये जरांगे-पाटील यांच्या टीकेचा रोख हा केवळ देवेंद्र फडणवीस यांच्यावर होता. तोंडी लावायला तेवढे छगन भुजबळ होते. या सर्व घडामोडीत ओबीसी एकसंघपणे भाजपच्या पाठीशी उभा राहिला.